परिपत्रक :

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८
भूमि जिंदगी विभाग
क्रमांक :क्र.भुजि/ /कावि/ /२०२०
दिनांक : ०२/०१/२०२०.

विषय : मनपा कार्यक्षेत्रातील रस्त्यांना व सार्वजनिक जागांना सन्मानीय/महापुरुषांची नांवे, क्रमांक देणेबाबत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६३(९) मध्ये महापालिकेमध्ये निहीत असलेल्या रस्त्यांना/ सार्वजनिक जागांना नांवे देणे किंवा अन्य जागांवर क्रमांक घालणे याबाबत तरतुद नमुद करण्यात आलेली आहे. महापालिका कार्यक्षेत्रातील रस्त्यांना व सार्वजनिक जागांना नांवे देण्याचे अधिकार मा.महापालिका सभेला होते. मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ३१२८ दिनांक २४.१.१९९६ अन्वये सदरचे अधिकार मा. प्रभाग समित्यांना प्रत्यावर्तीत करण्यात आलेले आहेत. त्यानुसार प्रभाग समित्यांनी आपल्या प्रभागांतर्गत असणा-या रस्त्यांना आणि सार्वजनिक जागांना सन्मानीय/महापुरुषांची अथवा अन्य नांवे देण्याची कार्यवाही करण्यात येते.

मा.प्रभाग समित्यांना सदरचे अधिकार बहाल केल्यामुळे या प्रभाग समित्यांमार्फत रस्त्यांना व सार्वजनिक जागांना दिलेल्या सन्मानीय/महापुरुषांच्या नांवामध्ये बदल करुन अन्य नांवे दिली जात असल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे मोठया प्रमाणावर वाद/कलह निर्माण होऊन प्रकरणे न्यायालयात दाखल झालेली आहेत. तसेच अनेक रस्ते वा चौक यांना एकाच महापुरुषाची नावे दिल्याने पत्ते शोधण्यात गल्लत होण्याची शक्यता आहे. सबब महापालिका कार्यक्षेत्रातील रस्त्यांना व सार्वजनिक जागांना नांवे देण्याबाबत स्वतंत्र धोरण निश्चित करणे आवश्यक आहे. तरी सर्व प्रभाग कार्यालयांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, जोपर्यंत महापालिका कार्यक्षेत्रातील रस्त्यांना व सार्वजनिक जागांना नांवे देण्याबाबत महापालिका स्वतंत्र धोरण निश्चित करीत नाही तोपर्यंत प्रभाग कार्यालमार्फत महापालिका कार्यक्षेत्रातील रस्त्यांना व सार्वजनिक जागांना नांवे देणेबाबतचे कोणतेही प्रस्ताव मंजुर करण्यात येऊ नयेत.

(श्रावण हर्डीकर)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८

प्रति,
१)मा.क्षेत्रिय अधिकारी
अ,ब,क,ड,ह,ग,इ,फ क्षेत्रिय कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी -४११ ०१८

२)सर्व संबंधित विभाग प्रमुख
-------------------------------------------
-------------------------------------------
-------------------------------------------
-------------------------------------------